# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

मा.सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, कोल्हापूर, महाराष्ट्र शासन यांचे जाक्र. सआसकको तृतीयपंथी धोरण हेल्पलाईन नं २०२५–२६/२३३दिनांक १९/०१/२०२६ रोजीच्या पत्रान्वये, भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांच्या SMILE योजनेअंतर्गत राष्ट्रीय ट्रान्सजेंडर हेल्पलाईन कमांक (14427) बाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने सोबत जोडलेले माहितीपर पोस्टर तयार करण्यात आले आहे. सदर पोस्टरमध्ये राष्ट्रीय ट्रान्सजेंडर हेल्पलाईन क्रमांक, सेवा स्वरूप कृ (सामान्य सहाय्य, मार्गदर्शन व समावेशनासाठी मदत तसेच शासकीय कल्याणकारी सेवांशी जोडणी) कृ याबाबत संक्षिप्त, स्पष्ट व समाजोपयोगी माहितीचा समावेश करण्यात आलेला आहे. शिवाजी विद्यापीठ परिसर तसेच संलग्न महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांच्यामध्ये सामाजिक समावेशन, संवेदनशीलता व हक्क–जागरूकता वाढविण्याच्या दृष्टीने सदर पोस्टरचा व्यापक प्रसार करणे अत्यंत आवश्यक आहे. तरी

१. सदर पोस्टर विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे.

२. विद्यापीठ रेडिओ/जनसंपर्क माध्यमांद्वारे प्रसारित करणे आवश्यक आहे.

३. अधिविभाग, केंद्रे, अध्यासने व संलग्न महाविद्यालयांमध्ये सदरची माहिती नोटीस बोर्डवर किंवा विद्यार्थ्यांच्या दृष्टीक्षेपात येईल अशा ठिकाणी लावणे आवश्यक आहे.

तरी सर्व संबंधितांनी सदर जनजागृती पोस्टर तात्काळ प्रदर्शित करावे व प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करावी. सदर उपक्रम हा पूर्णत: जनहितार्थ व सामाजिक समावेशनाच्या उद्देशाने राबविण्यात येत असून, सदर उपक्रम राबवला आहे याचा पुरावा म्हणून केलेल्या कार्यवाहीचे फोटो (Geotag) सहित माहिती शासनाला पाठविण्यासाठी त्वरित csseip@unishivaji.ac.in या ईमेल वर कॉलेज/अधिविभाग/अभ्यास केंद्र /अध्यासनाचे नाव सहित पाठवावेत.

कुलसचिव

दिनांक : 27 JAN 2026

प्रति,

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी व माहितीसाठी.

२. स्वीय सहाय्यक, मा. प्रभारी कुलगुरू, मा. प्रभारी प्र–कुलगुरू, मा. कुलसचिव, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी यांना माहितीसाठी.

३. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव.

४. सर्व रेक्टर यांनी सदरचे परिपत्रक वसतिगृहातील नोटीस बोर्डवरती लावण्याची व्यवस्था करावी.

५. सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्या निर्दशनास आणावे.

महाराष्ट्र शासन

सहायक आयुक्त, समाज कल्याण, कोल्हापूर.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, विचारेमाळ, कोल्हापूर.

दु. क्र. ०२३१-२६५१३१८ E-mail :- acswokolhapur@gmail.com

जाक्र.सआसकको /तृतीयपंथी धोरण /हेल्पलाईन नं/२०२५-२६ २३२ दि.१९/०१/२०२६

प्रति,

Date - 20-Jan-2026
45
Dr. Bhale sir

१. मा.आयुक्त,कोल्हापुर महानगरपालिका, कोल्हापुर
२. मा.आयुक्त,इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी
३. मा.मुख्यकार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद,कोल्हापूर
४. मा.पोलिस अधीक्षक,कोल्हापूर
५. मा.कुलसचिव, शिवाजी विद्यापिठ, कोल्हापुर
६. मा.जिल्हा शल्यचिकीत्सक,छत्रपती प्रमीलाराजे रूग्णालय,कोल्हापूर
७. मा.अधिष्ठाता,राजर्षी शाहू शासकीय वैदयकीय महाविदयालय कोल्हापूर
८. कार्यकारी अभियंता, सामाजिक बांधकाम विभाग (उत्तर व दक्षिण), कोल्हापूर
९. शिक्षण सहसंचालक कोल्हापूर
१०. सहसंचालक (शिक्षण), लक्ष्मीपुरी कोल्हापुर
११. महा व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, कोल्हापुर
१२. सहाय्यक आयुक्त, कामगार कल्याण, कोल्हापूर
१३. सहाय्यक संचालक, इतर मागास व बहुजन कल्याण विभाग, कोल्हापुर
१४. प्रादेशिक अधिकारी,एम.आय.डी.सी.कोल्हापूर
१५. विभागीय नियत्रंक एस.टी.महामंडळ कोल्हापूर
१६. उप आयुक्त,पशुसंवर्धन कार्यालय कोल्हापूर
१७. जिल्हा व्यवसाय प्रशिक्षण अधिकारी, कोल्हापुर
१८. तहसिलदार ( सर्व ), कोल्हापूर
१९. मुख्य अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, कावळा नाका, कोल्हापूर
२०. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद, कोल्हापूर
२१. उपसंचालक शिक्षण, राजाराम कॉलेज कोल्हापूर
२२. सहसंचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, कोल्हापुर
२३. जिल्हा विधी व सेवा प्राधिकरण, कोल्हापूर
२४. महसुल व वन विभाग, कोल्हापूर
२५. जिल्हा नियोजन अधिकारी, कोल्हापूर
२६. सर्व कार्यासने ( जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापुर )
२७. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर
२८. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, कोल्हापूर
२९. उपजिल्हाधिकारी (अन्न व नागरी पुरवठा), कोल्हापूर
३०. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, कोल्हापूर
३१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर
३२. जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर.
३३. मुख्याधिकारी,नगरपालिका/नगरपंचायत सर्व जिल्हा कोल्हापूर

Dr. Bhale
20/1/26.

३४.व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ लिमिटेड, कोल्हापूर
३५. व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ, कोल्हापुर
३६. व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ ( मर्यादित ), कोल्हापुर
३७. व्यवस्थापक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ ( मर्या ), कोल्हापुर
३८. व्यवस्थापक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, कोल्हापूर.

विषय :-तृतीयपंथीयांसाठी केंद्राच्या हेल्पलाईनची मोफत प्रचार व प्रसिध्दी करणेबाबत.

संदर्भ :- १. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. तृतीय - २०२३/प्र.क्र.१२२/ सामासु, दि. ११ मार्च २०२४.
२.मा.आयुक्त समाजकल्याण पुणे यांचे पत्र क्रं.क्रं.सकआ/मावक/ज्येष्ठना/निवेदन/२०२५- २६/ का-१२/२८६४ दि.०६ जानेवारी,२०२६.

महोदय,

भारतीय राज्यघटना सर्व व्यक्तींसाठी न्याय, स्वातंत्र्य, आणि समानतेची हमी देते. ट्रान्सजेंडर/तृतीयपंथीय व्यक्तींसह सर्वांनी प्रतिष्ठेनी जगण्यासाठी एक सर्वसमावेशक समाज व्यवस्था अनिवार्य करते. प्राचीन काळापासून तृतीयपंथीय व्यक्ती भारतीय समाज व्यवस्थेचे घटक आहेत. लैंगिक समानता प्रस्थापित करणे हे लोककल्याणकारी राज्यव्यवस्थेचे प्रमुख उद्दिष्ट असून महाराष्ट्र राज्य सुद्धा त्या दिशेने अग्रणी आहे. लैंगिक समानता म्हणजे व्यक्तींमध्ये लैंगिकतेच्या आधारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव न बाळगता सर्वांना कायद्याचे समान रक्षण आणि कायद्याप्रती सर्व व्यक्ती समान असल्याचे धोरण होय. सर्व व्यक्तींना समानता प्रदान करण्याच्या दृष्टीने शासनाला दुर्लक्षित घटकांकरिता विशेष कायदे आणि योजना करण्याचे अधिकार प्राप्त आहेत. तृतीयपंथी व्यक्ती सुद्धा समाजातील दुर्लक्षित घटक आहेत. सदर घटकाचा उल्लेख ट्रान्सजेंडर असा असून केंद्र शासनाच्या "ट्रान्सजेंडर व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) कायदा, २०१९" आणि ट्रान्सजेंडर व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) नियम, २०२० यांच्याशी सुसंगत प्रस्तुत महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी/ ट्रान्सजेन्डर व्यक्तींच्या समस्यांचे निरसन व कल्याणात्मक उपाययोजना करण्याकरिता गठीत केलेल्या समितीचा सदर अहवाल तृतीयपंथी व्यक्तींना समान संधी आणि त्यांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी राज्याच्या वचनबद्धतेचा विचार करुन तयार करण्यात आला आहे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्याने महाराष्ट्र राज्याचे तृतीयपंथीय धोरण - २०२४ स्विकारले आहे. त्यानुसार भारतीय राज्यघटनेतील कलम ४६ नूसार राज्यातील वंचित दुर्बल घटकांचे हक्क व अधिकारांचे संरक्षण करुन त्यांचा सामाजिक, अर्थिक व शैक्षणिक विकास करेणबाबत प्रयत्न करीत आहे.

तथापी, वरील संदर्भ क्र. २ अन्वये तृतीयपंथी व्यक्तीसाठी शासनामार्फत स्वतंत्र पोर्टल तयार करण्यात आले असून सदर पोर्टलवर तृतीयपंथीयांसाठी नॅशनल हेल्प लाईन क्रमांक १४४२७ देण्यात आला आहे.

त्यानुषगांने आपणांस विनंती करणेत येते की, आपल्या अधिनस्त असणा-या आस्थापनामध्ये तृतीयपंथी नॅशनल हेल्पलाईन बाबत प्रचार प्रसिध्दी करण्यात यावी ही विनंती व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालय यांचेकडे सादर करावा.

सचिन साळे,
सदस्य सचिव
तृतीयपंथीय तक्रार निवारण समिती तथा
सहायक आयुक्त,समाजकल्याण कोल्हापूर

SUPPORT FOR MARGINALIZED INDIVIDUALS FOR LIVELIHOOD AND ENTERPRISE
SMILE

सत्यमेव जयते
Government of Maharashtra
महाराष्ट्र शासन

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
ज्ञानमेवामृतम्
Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

# 📞 NATIONAL TRANSGENDER HELPLINE

# (SMILE SCHEME)

# 14427

---

✓ GENERAL SUPPORT

✓ GUIDANCE & INCLUSION ASSISTANCE

✓ LINKAGE TO GOVERNMENT WELFARE SERVICES

***You Are Not Alone | We Are Here to Support You***

**Shivaji University Kolhapur**

सत्यमेव जयते

Government of Maharashtra

महाराष्ट्र शासन

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

# 📞 राष्ट्रीय ट्रान्सजेंडर हेल्पलाइन

# (स्माईल योजना)

# १४४२७

✓ सामान्य सहाय्य

✓ मार्गदर्शन आणि समावेशासाठी मदत

✓ शासकीय कल्याणकारी सेवांशी जोडणी

तुम्ही एकटे नाही आहात | आम्ही तुम्हाला साथ देण्यासाठी येथे आहोत

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर